साप्ताहिक
# दर्पण जगत

संपादक : पवन अशोक खंबायत, मो.७२७६२८५६७८ Email.: darpanjagat2017@gmail.com RNI No. MAHMAR/2017/73940

■ वर्ष ९ वे ■अंक २४ ■ मंगळवार, दि.१७ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठ ६ ■ किंमत ४ रुपये

## शाळांना अल्पसंख्याक दर्जा प्रकरण!

**मुंबई –** अल्पसंख्याक समाजासाठी असलेला निधी प्रत्येक घटकाला समप्रमाणात आणि पारदर्शकपणे वितरित व्हावा, तसेच विभागाचे कामकाज अधिक लोकाभिमुख व समाजाप्रती उत्तरदायी राहण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.

तसेच शाळांना चुकीच्या पद्धतीने अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेल्या प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक विकास विभागाची आढावा बैठक सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सहसचिव मनोज जाधव, उपसचिव मि. प. शेणॉय, अवर सचिव सारंगकुमार पाटील, अवर सचिव जहांगीर खान, अवर सचिव विशाखा आढाव तसेच अवर सचिव मेघना शिंदे उपस्थित होत्या. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, राज्यातील अल्पसंख्याक समुदायाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी शासन कटिबद्ध आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री आदरणीय दादांनी ठरवून दिलेल्या ध्येयधोरणांनुसारच विभागाची वाटचाल व्हावी.मौलाना आझाद महामंडळाच्या शैक्षणिक कर्जाची मर्यादा ५ लाखांवरून २० लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आल्याचे सांगून, या योजनेचा लाभ प्रत्यक्ष गरजूंनाच मिळेल याची काटेकोर दक्षता घ्यावी, असेही त्यांनी बजावले. तसेच राज्यातील डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना अंतर्गत पायाभूत सुविधांचे अनुदान २ लाखांवरून १० लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आले असून, पात्र संस्थांची निवड करताना पूर्ण पारदर्शकता राखावी, असे निर्देश दिले.

## शिवसेना शिंदे आक्रमक..

**मुंबई–** राज्यात काँग्रेस भाजपमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टिपू सुलतान वाद शिगेला पेटलेला असताना महायुतीत एकनाथ शिंदे व गणेश नाईक समर्थकांमध्ये चांगलीच जुंपली आहे.

श्रीकांत शिंदे यांच्या नंतर नाईक यांच्या विधानावर उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार, नरेश म्हस्के, निलेश राणे, रविंद्र धंगेकर, ज्योती वाघमारे तुटून पडले आहेत.नाईक यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे सामंत यांनी सांगितले. शिंदे सेना नाईकांवर टीका करीत असताना नाईकांची पाठराखण करण्यास एकही भाजप नेता पुढे आला नाही.

नाईक यांनी एका मुलाखतीत श्रीकांत शिंदे यांना माजी खासदार करुन टाकेन असे विधान केले. त्यावरुन नाईकांवर शिंदे सेनेकडून जोरदार टीका सुरु झाली आहे. नाईकांच्या या टिकेला श्रीकांत शिंदे यांनी उत्तर दिले.

पुढील निवडणुकीत नाईकांनी ठाणे किंवा कल्याण लोकसभा मतदार संघात माझ्यासमोर उभे राहून दाखवा. त्यांची खुमखुमी जिरवली जाईल. त्यांना स्मृतीभ्रमंश झाला आहे. त्यांच्या घरात यापूर्वी त्यांच्यासह सर्वजण माजी झाले आहेत. अशी टीका करुन श्रीकांत शिंदे यांनी नाईकांना पुन्हा डिवचले.

एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व देशाने मान्य केले आहे. त्यांच्यावर टीका करुन प्रसिध्दीच्या झोतात राहण्याचा नाईक प्रयत्न करीत आहेत.

## मराठा प्रीमियर लीगमध्ये पत्रकारांचा मैत्रीपूर्ण सामना रंगला उत्साहात

**जळगाव–** जळगाव शहरात सुरू असलेल्या मराठा प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेअंतर्गत पत्रकार बांधवांसाठी विशेष मैत्रीपूर्ण सामन्याचे आयोजन करण्यात आले. शहरातील सागर पार्क मैदानावर दुपारी हा सामना रंगला. प्रिंट मीडिया विरुद्ध इलेक्ट्रॉनिक मीडिया अशा दोन संघांमध्ये झालेल्या या सामन्यात प्रिंट मीडिया संघाने ८० धावांचे लक्ष्य अवघ्या ६ षटकांत पूर्ण करत दिमाखदार विजय मिळवला. निर्धारित ८ षटकांच्या सामन्यात इलेक्ट्रॉनिक मीडिया संघाने दिलेले ८० धावांचे आव्हान प्रिंट मीडिया संघाने संयमी फलंदाजीच्या जोरावर सहज पार केले.

या सामन्यात इलेक्ट्रॉनिक मीडिया संघाकडून एबीपी माझाचे चंद्रशेखर नेवे, टीव्ही ९ मराठीचे किशोर पाटील, लोकशाहीचे सुमित देशमुख, एनडीटीव्ह




मराठीचे मंगेश जोशी, झी २४ तासचे वाल्मीक जोशी, साम टीव्हीचे संजय महाजन, न्यूज १८ मराठीचे विजय वाघमारे, नितीन नांदुरकर तसेच सचिन गोसावी यांनी सहभाग नोंदवला. तर प्रिंट मीडिया संघाकडून चेतन वाणी, पवन खंबायत, आकाश बाविस्कर, प्रवीण आढाव, विक्रम कापडणे, राकेश वाणी, भूषण हंसकर, सतीश सैंदाणे आणि वसीम खान यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. सामन्यादरम्यान खेळाडूंनी क्रीडाभावना जपत उत्साहपूर्ण वातावरणात खेळ सादर केला.

मराठा प्रीमियर लीगच्या आयोजकांनी पत्रकारांसाठी हा विशेष सामना आयोजित करून क्रीडा आणि पत्रकारिता यांचा सुंदर संगम घडवून आणला. व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून पत्रकार बांधवांना मैत्रीपूर्ण वातावरणात खेळण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. अशा उपक्रमांमुळे परस्परांतील स्नेह अधिक दृढ होत असून शहरातील क्रीडामय वातावरणालाही चालना मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## टोमॅटो पिक परिसंवाद उत्साहात, शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जळगाव –** जैन फार्म फ्रेश फूड्स लि. (जैन इरिगेशन सिस्टीम्सची उपकंपनी) आणि कागोमे इंडिया प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित टोमॅटो पिक परिसंवाद संपन्न झाला. वावडदा–जळके रोडवरील प्रगतशील शेतकरी सुधाकर ओंकार येवले यांच्या शेतात हा कार्यक्रम झाला. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने टोमॅटो उत्पादन वाढवण्यासाठी हा परिसंवाद मार्गदर्शक ठरला.

परिसंवादात टोमॅटो रोपांची योग्य निवड, पूर्व मशागत, ठिबक सिंचनाद्वारे पाणी व्यवस्थापन, फर्टिगेशन आणि ऑटोमेशन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. शास्त्रीय पद्धतीने नियोजन केल्यास कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळवता येईल, याची प्रत्यक्ष उदाहरणांसह माहिती देण्यात आली. शासनाच्या विविध अनुदान योजनांबाबतही उपस्थित शेतकऱ्यांना




मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्यक्ष शेतातील प्रात्यक्षिकांमुळे तंत्रज्ञानाची अंमलबजावणी शेतकऱ्यांना अधिक सोपी वाटली.

कार्यक्रमाला कागोमे इंडिया प्रा. लि. जपानचे गुणवत्ता नियंत्रण विभागाचे प्रमुख हेंनरीज शिमुकावा तसेच वरिष्ठ व्यवस्थापक मिलन चौधरी आणि जैन फार्म फ्रेश फूड्स लि. विपणण विभागाचे उपाध्यक्ष रोशन शहा, सुधाकर ओंकार येवले, जळके गावातील कंपनीचे वितरक गजानन ठिबकचे संचालक पी.के. पाटील, गौतम देसर्डा, डी.एम. बऱ्हाटे, व्ही. आर. सोळंकी आणि संदीप जाधव, सागर भोये यांची उपस्थिती होती. करार शेती विभाग प्रमुख करार शेतीच्या माध्यमातून टोमॅटो पिकाचे उत्पादन आणि बाजारपेठेतील स्थिरता वाढवण्यासाठी गौतम देसर्डा यांनी संवाद साधला. विभागीय व्यवस्थापक डी. एम. बऱ्हाटे यांनी तांत्रिक सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. जगभरातील शेतकरी हवामान बदलाच्या समस्येला तोड देत असून त्यावर मात करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, खते व पाण्याचे काटेकोर नियोजन करायला हवे. इतर देशांच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांची उत्पादकता कमी का आहे



## संपादकीय...

# स्वच्छ पर्यावरणासाठी सक्षम अभियानाचा संकल्प!




भारत सरकारच्या ऊर्जा सुरक्षितता, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या 'सक्षम २०२५-२६ (संरक्षण क्षमता महोत्सव)' हे राष्ट्रीय अभियान १ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत (तेल आणि गॅस वाचवा, हरित ऊर्जा स्वीकारा)'' या घोषवाक्यासह संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे त्यानिमित्त

जागतिक पातळीवर वेगाने बदलणाऱ्या हवामानामुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे मानवासमोर आज मोठे आव्हान उभे राहिले आहे. पारंपरिक इंधनांचा वापर दिवसागणिक वाढत गेल्याने निसर्गावर मोठा ताण पडत असून, त्याचे दुष्परिणाम आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेवर ठळकपणे दिसू लागले आहेत. भविष्यात हे संकट आणखी भयावह होवू नये यासाठी समाजाने स्वच्छ, शाश्वत आणि पर्यावरणपूरक ऊर्जेकडे प्राधान्याने वळणे, ही काळाची गरज बनली आहे.

कोळसा, पेट्रोल, डिझेल यासारखी पारंपरिक इंधने मर्यादित स्वरूपाची आहेत. त्यांच्या ज्वलनामुळे मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड आणि इतर घातक वायू वातावरणात मिसळतात. यामुळे जागतिक तापमानवाढ, हवामानातील टोकाचे बदल, पावसाचे असमतोल स्वरूप तसेच आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. श्वसनविकार, हृदयविकार आणि त्वचारोग यांसारखे आजार याच प्रदूषणाशी थेट जोडलेले आहेत. यावर उपाय म्हणून नवी ऊर्जा क्रांती आकार घेत आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत, बायोगॅस, बायो-इंधन आणि हरित हायड्रोजन यांसारखे पर्याय आज प्रभावीपणे पुढे येत आहेत. या ऊर्जास्रोतांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे, ते अक्षय आहेत आणि पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचवता. पवन ऊर्जा निर्मितीमुळे इंधन आयातीवरील खर्च कमी होऊन देशाची आर्थिक बचतही होते. ऊसाच्या चिपाडापासून बनविल्या जाणाऱ्या इथेनॉलसारख्या पर्यायी इंधनाकडेही आपला देश गांभीर्याने पाहू लागला आहे.

अलीकडच्या काळाचा विचार केल्यास, वाहतूक क्षेत्रातही मोठे बदल होतांना दिसत आहेत. इलेक्ट्रिक वाहने, हायब्रिड वाहने आणि पर्यायी इंधनावर चालणारी वाहने यांचा वापर वाढत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्राधान्याने स्वच्छ इंधनाचा समावेश केल्यास प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. यासोबतच इंधन बचतीच्या सवयी, कार पूलिंग, सायकलचा वापर आणि पायी चालण्यास प्रोत्साहन देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

घरगुती पातळीवरही स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवता येऊ शकतो. सौर पॅनेलद्वारे वीज निर्मिती, बायोगॅस प्रकल्प, ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर आणि विजेचा अपव्यय टाळणे या छोट्या गोष्टी मोठा बदल घडवू शकतात. शाश्वत जीवनशैली स्वीकारणे म्हणजे केवळ पर्यावरणाचे संरक्षण नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडवण्याच्या दृष्टीने या ऊर्जा क्रांतिकडे पाहायला हवे.

या दिशेने केंद्र व राज्य सरकारांकडून विविध अभियानांद्वारे जनजागृती केली जात आहे. 'सक्षम'सारख्या मोहिमा नागरिकांना पर्यायी इंधनांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करत आहेत. उद्योग क्षेत्र, तसेच शहरे आणि ग्रामीण भागातही हरित ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली जात आहेत. यामध्ये संशोधन, नवतंत्रज्ञान आणि स्थानिक सहभाग आदिला विशेष महत्त्व दिले जात आहे.

स्वच्छ पर्यावरण हा केवळ सरकारचा किंवा एखाद्या संस्थेचा विषय नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

आज प्रत्येक स्तरावर घेतलेले छोटे निर्णय उद्याच्या मोठ्या संकटांना टाळू शकतात. पर्यायी ऊर्जेचा वापर, इंधन बचत, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्यास हरित, सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठी आपण भक्कम पायाभरणी करू शकतो. हीच खरी ऊर्जा क्रांती असून तिच्यात आपण सर्वांनी सहभागी होणे, ही काळाची गरज आहे.

# 'मुंबई क्लायमेट वीक' : हवामान कृतीसाठी भारताचा जागतिक मंच

मुंबईत होणारा भारतातील पहिला 'क्लायमेट वीक' हा हवामान बदलावर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीकडे नेणारा मंच ठरणार आहे. शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि नागरिक यांना एकत्र आणत हा उपक्रम ग्लोबल साऊथ देशांसाठी हवामान नेतृत्वाचा नवा नमुना मांडणार आहे.

अन्नसुरक्षा, स्वच्छ ऊर्जा आणि शहरी शाश्वतता या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर भर देत नवकल्पना, युवक सहभाग आणि लोकाभिमुख कार्यक्रमांद्वारे हवामान कृती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हवामान बदलावर उपाय म्हणजे सामूहिक जबाबदारी आणि तातडीची कृती हा यानिमित्ताने मुंबईतून दिला जाणारा संदेश स्पष्ट आहे.हवामान बदल ही भविष्यातील किंवा केवळ वैज्ञानिक चर्चेची गोष्ट राहिलेली नाही. पूर, उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, अन्नसुरक्षेची आव्हाने या सगळ्याचा थेट परिणाम आपल्या दैनंदिन आयुष्यावर होत आहे. अशा पार्श्वभूमीवर मुंबईत १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणारा मुंबई क्लायमेट वीक () हा भारतासाठी आणि विशेषतः ग्लोबल साऊथ देशांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

### हवामान चर्चेपासून प्रत्यक्ष उपायांकडे

मुंबई क्लायमेट वीकचा उद्देश केवळ हवामान बदलावर चर्चा करणे नसून, प्रत्यक्ष अंमलात आणता येतील असे उपाय शोधणे आणि त्यांना गती देणे हा आहे. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे तीन दिवस मुख्य कार्यक्रम होतील, तर मुंबई शहरभर महाविद्यालये, समुदाय केंद्रे आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध उपक्रम राबवले जातील. त्यामध्ये नेतृत्व संवाद, विविध विषयांवरील ट्रॅक्स, इनोव्हेशन चॅलेंज, यूथ ग्रीन इनोव्हेशन चॅलेंज तसेच उपाययोजनांचे प्रदर्शन क्षेत्र आदींचा समावेश असणार आहे.

''हब-अँड-स्पोक'' रचना म्हणजे एकाच वेळी धोरणात्मक चर्चा आणि लोकसहभाग दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न या निमित्ताने होणार आहे. हवामान कृती ही केवळ सरकारची जबाबदारी नसून समाजाच्या प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक आहे, हा संदेश यातून दिला जाणार आहे.

मुख्य केंद्रातील पहिल्या दिवशी अर्थशॉट प्राईज या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचे विशेष सत्र होणार असून, या सत्रात निसर्ग, अन्न प्रणाली आणि मानव यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. केन्सिंग्टन पॅलेस (यूके) येथील पथकाच्या मार्गदर्शनाखाली होणारा हा उपक्रम प्रिन्स विल्यम यांच्या संकल्पनेतून साकारलेला असून, मुंबई क्लायमेट वीकमध्ये तो प्रथमच आणि विशेष स्वरूपात सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमात ग्लोबल साऊथमधील हवामान नवोन्मेषक, प्रत्यक्ष उपाययोजना राबवणारे कार्यकर्ते तसेच भारतातील अग्रगण्य व्यक्ती सहभागी होणार असून, मोठ्या प्रमाणावर जनसहभाग वाढवण्याचा उद्देश आहे. याच कालावधीत विविध महाविद्यालये, वसाहती आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम होणार असून, त्यात रोड शो, कला व माध्यम उपक्रम तसेच सस्टेनेबिलिटी मेला यांचा समावेश आहे. या उपक्रमांद्वारे हवामान कृती दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.वातावरण हे मुंबई क्लायमेट विकचे नागरिक संवाद व्यासपीठ असून, याद्वारे नागरिकांना त्यांच्या हवामानविषयक मतांची मुक्त आणि अनफिल्टर्ड मांडणी करता येणार आहे. भाषणे, कविता, कथा, गाणी आणि इतर सर्जनशील माध्यमांद्वारे हवामानाशी संबंधित दैनंदिन अनुभव आणि मते मुंबई क्लायमेट वीकच्या केंद्रस्थानी आणल्या जाणार आहेत.

### ग्लोबल साऊथचा आवाज

हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम विकसनशील देशांवर होतो, परंतु उपाययोजनांच्या चर्चेत त्यांना कमी महत्त्व मिळते. मुंबई क्लायमेट वीक ग्लोबल साऊथ देशांसाठी एक नेतृत्व मंच उपलब्ध करून देणार आहे. मुंबई क्लायमेट वीक व्यापक भागीदारीच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक हा मुख्य भागीदार आहे. डेलॉईट ही धोरणात्मक ज्ञान भागीदार संस्था आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस) आणि आयआयटी बॉम्बे हे शैक्षणिक भागीदार आहेत.या उपक्रमात ३० हून अधिक देशांतील प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय संस्था, वित्तीय संघटना आणि उद्योग क्षेत्रातील नेते सहभागी होणार आहेत. बिल गेट्स, हिलरी क्लिंटन यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योगपती आणि नेते यांची उपस्थिती या कार्यक्रमाला जागतिक महत्त्व देते. यातून भारत हवामान विषयक नेतृत्व केवळ धोरण पातळीवर नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्याचा प्रयत्न करत आहे.

### तीन महत्त्वाचे केंद्रबिंदू

मुंबई क्लायमेट वीकची संकल्पना तीन प्रमुख क्षेत्रांवर आधारित आहे:

१. अन्नप्रणाली ( ) हवामान बदलाचा शेती आणि अन्नसुरक्षेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन टिकाऊ शेती आणि पोषण यावर भर.

२. ऊर्जा संक्रमण ( ) पारंपरिक ऊर्जेऐवजी स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेकडे वाटचाल.

३. शहरी शाश्वतता ( ) शहरांना हवामान बदलाच्या परिणामांपासून सुरक्षित आणि सक्षम बनवणे.

हे तीनही घटक भारताच्या विकासाच्या केंद्रस्थानी आहेत, त्यामुळे हा कार्यक्रम केवळ पर्यावरण विषयापुरता मर्यादित राहणार नाही.

### नवकल्पना आणि युवकांची भूमिका

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. हवामान समस्यांवर नवे उपाय शोधण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या सहकार्याने 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. स्टार्टअप, संशोधक आणि सामाजिक संस्था हे यामध्ये सहभागी होऊन आपले उपाय सादर करणार आहेत.युवकांसाठी स्वतंत्र हरित नवकल्पना स्पर्धा असेल. युनिसेफच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत आणि उपाययोजनांमध्ये सहभागी केले जाणार आहे. भविष्यातील हवामान नेतृत्व घडवण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

### विज्ञान, संस्कृती आणि नागरिक सहभाग

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. या सप्ताहात सार्वजनिक व्याख्याने, कला-संस्कृती कार्यक्रम, चित्रपट प्रदर्शन आणि नागरिक कार्यशाळा आयोजित केल्या जातील. हवामान बदल हा केवळ वैज्ञानिक विषय नसून सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नही आहे, हे यातून अधोरेखित होते.

१८ फेब्रुवारी रोजी विशेष सत्रात भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा आणि अंतराळवीर शुभांशु शुक्ला (दोघेही अशोक चक्र पुरस्कारप्राप्त) शालेय विद्यार्थ्यांशी तसेच जागतिक नेतृत्वाशी संवाद साधणार असून, अंतराळ संशोधन, विज्ञान आणि हवामान जबाबदारी यांचा परस्पर संबंध अधोरेखित केला जाणार आहे.

युनिसेफ () इंडिया आणि यु वाह () यांच्या भागीदारीत युवकांसाठी विशेष उपक्रम राबवले जाणार असून, १६ ते २४ वयोगटातील युवकांचा सहभाग असणार आहे. अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी लवचिकता या विषयांवरील युवकांच्या नवोन्मेषांचे प्रदर्शन मुंबई क्लायमेट वीकमध्ये करण्यात येणार आहे.

### हवामान कृतीचे नवे मॉडेल

मुंबई क्लायमेट वीक ही भारत आणि ग्लोबल साऊथ देशाच्या नेतृत्वाखालील, नागरिक-केंद्रित हवामान कृतीचे नवे मॉडेल ठरणार आहे. मुंबई क्लायमेट वीक हा सार्वजनिक-खासगी-नागरिक भागीदारीवर आधारित उपक्रम आहे. यामधून शहर पातळीवर हवामान उपाययोजना राबविण्याचा भारतीय नमुना साकारणार आहे. जर या मंचातून ठोस भागीदारी, निधी आणि धोरणात्मक निर्णय घडले, तर तो भारत आणि ग्लोबल साऊथ देशांसाठी दिशादर्शक ठरू शकतो.

हवामान बदल हा भविष्यातील नव्हे, तर वर्तमानाचा प्रश्न आहे. मुंबई क्लायमेट वीक हा या वास्तवाला सामोरे जाण्याचा सामूहिक प्रयत्न असून जिथे कल्पना, विज्ञान, उद्योग आणि नागरिक सहभाग एकत्र असेल.

हवामान कृती ही सर्वांची जबाबदारी आहे, आणि बदलाची सुरुवात आजपासूनच करावी लागेल, हा संदेश मुंबई क्लायमेट विकच्या माध्यमातून जगभरात जाईल हे नक्की.

– नंदकुमार बलभीम वाघमारे
वरिष्ठ सहायक संचालक
(माहिती)
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मुंबई

# आयटी आणि सुरक्षा एक्स्पो २०२६’ चे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते शानदार उद्घाटन



**जळगांव –** माहिती तंत्रज्ञान आणि सुरक्षा क्षेत्रातील नवनवीन बदलांची ओळख करून देण्यासाठी ‘जळगाव जिल्हा माहिती तंत्रज्ञान संघटना’ () तर्फे आयोजित ‘ आयटी आणि सुरक्षा एक्स्पो २०२६’ चे शानदार उद्घाटन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १३) पार पडले. शहरातील खान्देश सेंट्रल मॉल येथे १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे.

या सोहळ्याला जळगाव जिल्हा माहिती तंत्रज्ञान संघटनेचे अध्यक्ष अतुल पाटील, सीपी प्लसचे क्षेत्रीय व्यवस्थापक प्रविण पाटील, प्रमा कंपनीचे अंकुर ढोले, ऑल कनेक्टचे संदिप बिरारी, पवन मंधारे, चेतन गावंडे, पुणे असोसिएशनचे राहुल खुर्द, सिबा पाठक, आनंद जगदाळे, धुळे असोसिएशनचे प्रशांत देवरे यांची विशेष उपस्थिती होती.जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमध्ये ‘एआय’चा वापर करणार जिल्हाधिकारी

स्वतः सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेले जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी यावेळी तांत्रिक विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, ‘‘संगणकातील व्हायरस संक्रमणाबाबत विशेष काळजी घेणे गरजेचे असून सिक्युरिटी प्रॉडक्ट निवडताना गुणवत्तेवर भर दिला पाहिजे. जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमध्ये, विशेषतः सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ‘कम्प्युटर व्हिजन’ आणि ‘एआय आधारित अलर्ट जनरेशन’ तंत्रज्ञानाचा वापर आम्ही करणार आहोत. व्हिडिओ फीडच्या विश्लेषणातून एआयद्वारे चांगले निष्कर्ष काढता येतात.’’ आयटी आणि सिक्युरिटी इंडस्ट्रीमधील जनजागृती महत्त्वाची असल्याचे सांगत त्यांनी संघटनेच्या उपक्रमाचे कौतुक केले.एक्स्पो मध्ये आयटी प्रॉडक्ट्स, अत्याधुनिक सिक्युरिटी सिस्टिम्स, एआय () आधारित सीसीटीव्ही कॅमेरे आणि सोलर पॅनल यासह विविध स्टॉल लावण्यात आले आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे उपाध्यक्ष सुनील घोलप, सचिव सुरेंद्र मेहेंदळे, योगेश चौधरी, विनोद सोनार, संदिप राठोड आणि निलेश जैन यांनी परिश्रम घेतले. जास्तीत जास्त नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# यंदा शिवजयंतीची शोभायात्रा डीजे-गुलाल विरहित!

**जळगाव –** सर्वसमावेशक सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीतर्फे १९ रोजी सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमपासून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. ही शोभायात्रा गुलाल-डिजे विरहित रहणार असून यात घोडे, संजीव देखावे, सुशोभित रथ, पारंपरिक वाद्य राहणार आहे.शाळा-महाविद्यालयाचे विद्यार्थी शहरातील विविध दरम्यान,सहभागी होतील. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनामुळे सांस्कृतिक सप्ताह साजरा केला जाणार नसल्याची माहिती महोत्सव समितीचे अध्यक्ष मंत्री संजय सावकारे यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सव समितीने सामाजिक एकता जपण्याचा प्रयत्न नेहमीच केला आहे. समितीतर्फे महात्मा फुले जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, छत्रपती संभाजीराजे जयंती, राज्याभिषेक दिन साजरा केली जातो. यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यात नागरिक देखील उत्साहाने सहभागी होतात. यंदा देखील जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सांस्कृतिक महोत्सवाचे समितीतर्फे आयोजित करण्यात येणार असल्याचे महोत्सव समितीचे अध्यक्ष मंत्री संजय सावकारे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला राधेश्याम चौधरी, राम पवार, विनोद देशमुख, शंभू पाटील, लीना पवार आदींसह सर्वसमावेशक सार्वजनिक शिवजयंती महोत्सवसमितीचे कार्यकारिणीचे पदाधिकारी, सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते.

# जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या जन्मदिनी; जैन इरिगेशन संशोधीत ‘जैन मॅडरिन-१’ नव्या वाणाचे लोकार्पण



**जळगांव –** जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या ६३ व्या जन्मदिनाच्या औचित्याने, जैन इरिगेशनने संशोधित व विकसित केलेल्या ‘जैन मॅडरिन-१’ या नवीन संत्रा वाणाचे लोकार्पण अशोक जैन व सौ. ज्योती जैन यांच्या हस्ते जैन हिल्स येथील केळीच्या बनात करण्यात आले. या सोहळ्याला जैन इरिगेशनचे संस्थापक श्रद्धेय भवरलालजी जैन यांचा वारसा भक्कमपणे पुढे नेणाऱ्या जैन परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती. तसेच जैन इरिगेशनचे कृषितज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि सहकारी यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

नव्याने विकसीत केलेल्या जाती ‘जैन मॅडरिन-१’ ही जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेड () यांनी शेतकऱ्यांसाठी विकसित केलेले एक आधुनिक आणि उत्पन्नक्षम संत्र्याचे नवीन वाण आहे. पारंपरिक संत्र्याच्या तुलनेत ही जात लवकर फळधारणा होत असलेली आहे. या वाणामुळे कमी कालावधीत बाजारात येणारा दर्जेदार माल मिळत असल्याने शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्याची संधी वाढते. विशेष म्हणजे दुसऱ्याच वर्षापासून झाडांना फळधारणा सुरू होते, त्यामुळे संत्रा बाग गुंतवणुकीवर लवकर परतावा मिळतो.

या संत्र्याची चव ही नागपूर संत्र्यापेक्षा अधिक गोड असून फळांचा रंग आकर्षक, गडद आणि लालसर केशरी ( ) असतो. फळांचा आकार, सोलण्याची सुलभता आणि रसाळपणा यामुळे ‘जैन मॅडरिन-१’ हा टेबल पर्पज म्हणजेच थेट खाण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

ग्राहकांच्या पसंतीस उतरतील असे दर्जेदार फळ मिळत असल्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेसोबतच निर्यातीसाठीही ही जात आशादायक ठरू शकते असा विश्वास कंपनीचे लिंबू वर्गीय फळांचे संशोधक डॉ. मिलींद लदानिया यांनी सांगितले.

उत्पादनाच्या दृष्टीने ही जात भरघोस उत्पादन देणारी आहे. या जातीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे फुलधारणा करण्यासाठी पाण्याचा ताण ( ) देण्याची आवश्यकता नसते, त्यामुळे पाणी व्यवस्थापन अत्यंत सुलभ होते.

# मू.जे. महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे राष्ट्रीय मायक्रोबायो ऑलिम्पियाड स्पर्धेत यश

**जळगाव –** येथील मू. जे. महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, मुंबई, छत्रपती संभाजीनगर व सीकेटी महाविद्यालय (न्यू पनवेल) यांच्यातर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील २४ व्या मायक्रोबायो ऑलिम्पियाड स्पर्धेत तृतीय स्थान मिळविले. संघातसार पाटील, दीपेश जाधव व प्रतीक ठोंबरे यांचा समावेश होता. राष्ट्रीय स्तरावरील मायक्रोबायो पोडियम स्पर्धेत मू. जे. महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील गायत्री मोरे हिने दहापैकी चौथ्या स्थान मिळविले. स्पर्धेच्या राष्ट्रीय समन्वयक म्हणून डॉ. नयना पाटील यांनी कार्य केले.

# डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजीओथेरेपीत क्रिडा महोत्सवाचा समारोप




**जळगाव –** डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या क्रिडा महोत्सवाचा आज समारोप करण्यात आला. तिन दिवस चाललेल्या या महोत्सवात विविध क्रिडा स्पर्धा जल्लोषात घेण्यात आलेल्या विजेत्यांना पारीतोषीक वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले. महिला क्रिकेट स्पर्धा महिला क्रिकेट स्पर्धेत अराघ्या टीम विजयी ठरली. विजयी संघात भारती जगताप, श्रुती गेडाम, गौरी कुंभाळकर, तिलोत्तमा चौधरी, समीक्षा गोपाळ, तृप्ती पाटील, श्रद्धा भुतडा, ऋतुजा लोखंडे, हतुजा इंगळे, आचल व निशा उईके याचा सहभाग होता.या संघाने उत्कृष्ट समन्वय आणि संघभावना दाखवत विजेतेपद पटकावले.पुरुष क्रिकेट स्पर्धा पुरुष क्रिकेटमध्ये रिसेनने शानदार कामगिरी करत विजेतेपद मिळवले.विजयी संघात नईम तडवी, ओम चौधरी, चंदन मौर्या, नौमान मुस्तफिज, हमजा सिद्दीकी, प्रणव मुखेडकर, आदित्य बच्छाव, रोहित मारू, प्रफुल पंचोदबरिया, जीत खत्री, फहीम खान आणि झैद शेख यांचा समावेश होता. खो-खो स्पर्धा खो-खो स्पर्धेतही रिसेनने विजेतेपद पटकावले. -दिव्या विशे, पूजा दानवे, सायली शेलके, साक्षी इंगळे, साक्षी खोंडले, तनिषा पवार, सानिका लाखोटिया, वैष्णवी सावंत व मिसबह यांचा समावेश होता. गोळाफेक स्पर्धा मुली गट विजेते: १) खुशी अर्जपुरे ५.४ मीटर २) ट्विंकल माळी ५.२ मीटर ३) वैष्णवी गुट्टे ५.१ मीटर मुले गट विजेते: १) युवराज पाटील ८.२ मीटर२) अंकित राऊत ८ मीटर३) गणेश दुधाभाते ७.७ मीटर, बॅडमिंटन स्पर्धा बॅडमिंटनमध्ये बार्टी शेजुळ आणि ट्विंकल माळी या जोडीने विजेतेपद पटकावले, तर समृद्धी आणि खुशी जोगे या जोडीने उपविजेतेपद मिळवले.

# बेंडाळे महाविद्यालयात भारतातील सांस्कृतिक, भाषिक आणि सामाजिक-आर्थिक विविधते वर व्याख्यान संपन्न.

**जळगाव –** लेवा एजुकेशनल युनियन संचलित डॉ. अण्णासाहेब जी . डी . बेंडाळे महिला महाविद्यालय (स्वायत्त), जळगाव येथे राज्यशास्त्र विभाग आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील सांस्कृतिक, भाषिक आणि सामाजिक-आर्थिक विविधता या विषयावर मा. प्रा. निता पाटील (कला, वाणिज्य आणि गृहशास्त्र महाविद्यालय, जळगाव) यांच्या शुक्रवार, १३ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयाच्या धांडे सभागृहात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पाटील यांनी आपल्या व्याख्यानात भारतातील विविध संस्कृती, भाषा आणि सामाजिक-आर्थिक रचनेतील विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले. भारताची एकता ही विविधतेतूनच बळकट होत असल्याचे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. तसेच विद्यार्थिनींनी राष्ट्रीय एकात्मता जपत सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्यासाठी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य मा. डॉ. सत्यजित साळवे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विविधतेचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थिनींना व्यापक दृष्टीकोन विकसित करण्याचे मार्गदर्शन केले.

# फेसबुक सांभाळा!

'फेसबुक'ने आपल्या सर्वाचेच आयुष्य व्यापून टाकलेले आहे. अगदी शाळे-त शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच जण फेसबुकचा वापर करत असतात. फेसबुकने सर्वसामान्यांना मोठे समाज व्यासपीठ मिळवून दिले आहे, यात शंकाच नाही. मात्र, अनेकदा त्याचा वापर करताना पुरेशी खबरदारी न घेतल्याने एकतर वापरकर्त्यांला नुकसान सोसावे लागते किंवा त्याच्यामुळे इतरांना मनस्ताप होतो. त्यातच फेसबुकच्या वैयक्तिक सुरक्षिततेची काळजीही अनेक जण नीट घेत नाही. याचाच गैरफायदा हॅकर्स मंडळी घेतात व वापरकर्त्यांचे अकाऊंट हॅक करतात. अशा 'हॅक' झालेल्या खात्याचा वापर चुकीच्या गोष्टींसाठी केला जा-तो. त्यामुळे फेसबुकचा वापर करताना वापरकर्त्यांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. आ-पले फेसबुक खाते हॅकर्सपासून सुरक्षित ठेवण्यासाठी काय करता येईल, हे आपण जाणून घेऊ.

फिशिंग :

यामध्ये हॅकर्स फेसबुकच्या लॉगिन पेजसारखे दिसणारे बनावट लॉगिन पेज बनवतात. यानंतर हॅकर्स त्या व्यक्तीच्या ईमेलवर खोटय़ा पेजची लिंक पाठवतो किंवा माहितीतल्या व्यक्तीला स्वत:चा मोबाइल फेसबुकसाठी वापरण्यास देतात आणि जेव्हा ती व्यक्ती आपला लॉगिन आयडी व पासवर्ड त्या नकली पेजवर टाइप करते तेव्हा त्याचा ईमेल पत्ता आणि पासवर्ड मिळतो. हॅकर वापरकर्त्यांचा फेसबुक अकाऊंट हॅक करतो. फिशिंगचा वापर करून गोपनीय माहिती चोरणे हे बेकायदेशीर कृत्य असून सदर कृत्य दंडनीय अपराध आहे.

की लॉगर (घशूश्रेससशी) :

हॅकर्स विविध सॉफ्टवेअर तसेच फोटो यामधून या प्रोग्रॅमचा प्रसार करतात. हा प्रोग्राम युजरच्या कॉम्प्युटरवर इंस्टॉल झाल्यानंतर युजर्सचे सर्व डिटेल्स रिकॉर्ड करतो. युजर्सचे हे डिटेल्स हॅकर्सला एफटीपीद्वारे किंवा ईमेल पत्त्यावर पाठविले जातात.

फेक मजकूर प्रसारित केल्यास..

अश्लील व आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याबद्दल भारतीय दंडविधानाच्या २९२ कलमान्वये गुन्हा दाखल होऊ शकतो. त्या अंतर्गत दोन ते पाच वर्षांचा तुरुंगवास आणि दंड अशी शिक्षेची तरतूद आहे. माहिती तंत्रज्ञानाचे कलम ६६ हे संगणकाशी संबंधित गुन्ह्यांसाठी वापरले जाते. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याबद्दल ६६ (अ) कलमान्वये तीन वर्षे तुरुंगवास आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. 'आयडेंटिटी थेफ्ट' म्हणजे 'वैयक्तिक संवेदनशील माहिती'ची चोरी व गैरवापर केल्याबद्दल ६६(क) कलमान्वये तीन वर्षे तुरुंगवास आणि एक लाख रुपये दंडापर्यंतची शिक्षा होऊ शकते.

'प्रायव्हसी'च्या उल्लंघनाबद्दल ६६(इ) कलमान्वये तीन वर्षे तुरुंगवास आणि दोन लाखांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. आक्षेपार्ह लैंगिक कृत्य किंवा मजकूर प्रसारित, प्रकाशित केल्याबद्दल ६७(अ) कलमान्वये पाच ते सात वर्षे तुरुंगवास आणि दहा वर्षे दंडाची शिक्षा होऊ शकते. अल्पवयीन मुलांचे आक्षेपार्ह लैंगिक कृत्य किंवा मजकूर प्रसारित केल्याबद्दल ६७ (ब) कलमान्वये पाच ते सात वर्षे तुरुंगवास आणि दहा लाख रुपये दंडाच्या शिक्षेची तरतूद कायद्यात आहे.

हॅकिंगपासून कसे सुरक्षित राहाल?

फेसबुक लॉगिन केल्यानंतर होमपेजच्या उजव्या बाजूला असलेल्या सेटिंग्जवर क्लिक करा. त्यामध्ये ऋशपशी-रश्र, डशलीीळीूं रपव डेस-ळप, झीळींरलू,ढळाशश्रळपश रपव ढरससळपस असे पर्याय दिसतील. तिथे डशलीीळीूं रपव डेसळप क्लिक केल्यावर डशीं-ींळपस णाएींीर डशलीीळीूं या पर्यायात असणाऱ्या णीश ीुं-षरलीीं रींीहशपींळलरींळेप वर क्लिक करून तुमचा मोबाइल नंबर त्यात नोंदवा. त्यानंतर तुम्ही फेसबुकवर लॉगइन करताना मोबाइल क्रमांकावर एक कोड येईल. त्याआधारे तुमचा फेसबुक पासवर्ड आणि हा कोड नोंदवून तुम्ही फेसबुकवर लॉगइन करू शकाल.

**– प्रा. योगेश हांडगे**

# नृत्यकलेत करिअर



नृत्यकलेला भारताच्या प्राचीन कलांपैकी एक मानले जाते. तसेच वर्तमानातही या कलेला हवे तेवढे महत्त्व देण्यात आलेले आहे. आपल्यातील अनेकांना एखादे गाणे अथवा संगीत लागले की, नृत्य करायची इच्छा होते. मात्र, आपण करत असलेल्या नृत्याला कोणतीही पार्श्वभूमी अथवा त्यामध्ये लयबद्धता नसते. त्यामुळे अशाच क लाकारांच्या अंगातील नृत्यासंबंधी असणारे सुप्तगुण ओळखून ते लोकांसोमर आणण्याचे काम एक नृत्य शिक्षक (कोरिओग्राफर ) करीत असतो. मात्र त्यासाठी काही विशिष्ट गुण कोरिओग्राफरमध्ये असणे गरजेचे आहे. तुमच्यातही असे गुण असतील तर तुम्हीदेखील या क्षेत्रामध्ये तुमचे एक वेगळे अस्तित्व निर्माण करू शकता.

आवश्यक पात्रता– उत्तम कोरिओग्राफर बनण्यासाठी तुम्ही स्वतः विविध नृत्य शिलींमध्ये प्रशिक्षित असणे गरजेचे आहे. स्वतः चांगले नृत्य करुन विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण देण्याची योग्यता तुमच्यात असणे आवश्यक आहे. तसेच या क्षेत्राशी निगडित सखोल ज्ञान, कल्पनाशक्ती, तासं-तास अभ्यास करण्याची आणि करुन घेण्याची क्षमता, धैर्य, लय-ताल आदींचे सखोल ज्ञान, संगीताची उत्तम जाण, सादर करण्याची कला आदी गुण असणे आवश्यक आहेत. त्यासोबतच शारीरिक तंदुरस्ती चांगली असणे, उत्तम संवाद कौशल्य आदी गुण असणे महत्त्वाचे आहे. एका उत्तम कोरिओग्राफरमध्ये अनुभव, कल्पनाशक्ती सोबतच काहीतरी नवीन करण्याची इच्छाशक्ती असणे गरजेचे आहे.

वरील सर्व गुण तुमच्या असतील अथवा ते तुम्ही संपादित करू शकणार असाल, तर फिल्म अँड व्हिडिओ कोरिग्राफर, इव्हेंट कोरिओग्राफर तसेच इतर क्षेत्रांमध्ये तुम्हाला करिअर करण्याची संधी आहे. याशिवाय आजकाल मॉडेलिंग क्षेत्रात रॅम्प वॉक करणाऱ्या मॉडेल्स संगीतावर कॅटवॉक करताना दिसतात. त्यामुळे त्यांना यामध्ये अधिक चांगल्या प्रकारे प्रशिक्षित करण्याचे काम तुम्ही फॅशन कोरिओग्राफर म्हणून करू शकता.

शैक्षणिक अर्हता – देशभरात अशा अनेक संस्था आहेत ज्या ठिकाणी एक अथवा दोन वर्षांचे शिक्षण दिले जाते. यासाठी उमेदवाराने १२ वी परिक्षा उत्तीर्ण असणे अवश्यक आहे. आज काही प्रसिद्ध कोरिओग्राफर्सने स्वतःच्या प्रशिक्षण संस्था सुरू केल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना या ठिकाणी प्रशिक्षणाबरोबरच त्यांच्या मदतीने एख-ादे काम मिळण्यासही मदत होते.

कुठे आहेत करिअरच्या संधी? : या क्षेत्रात आवश्यक असणारे शिक्षण पूर्ण केल्यानंतर आणि त्यातील अनुभवानंतर तुम्ही स्वतः चे प्रशिक्षण केंद्र सुरू करू शकता. त्याशिवाय टेलिव्हिजन, चित्रपट, व्हिडिओ कंपनी, मॉडेलिंग संस्था, इव्हेंट मॅनेजमेंट आदींसोबत काम करुन तुम्हाला रोजगार कमविण्याच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. डान्स स्टुडिओ, परफॉर्मिंग आर्ट कंपनी आदींमध्येदेखील अनेक संधी असून अनुभवाच्या जोरावर तुम्ही या क्षेत्रामध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करू शकता.

कुठे मिळेल शिक्षण?

पश्यामक दावर इन्स्टिट्यूट फॉर परफॉर्मिंग आर्टस, मुंबई.
पटेरेंस लुईस आयएनसी, इंडिया, मुंबई.
पभारतीय कला केंद्र, नवी दिल्ली.
पफॅकल्टी ऑफ आर्टस, म्हैसूर यूनिर्व्हसिटी, म्हैसूर.
पडान्स वर्क परफॉर्मिंग आर्टस अकादमी, नवी दिल्ली.
पनात्या इन्स्टिट्यूट ऑफ कथ्थक अँड कोरिओग्राफी, बंगळुरु.
पआनंद शंकर सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्टस, कोलकाता

# जनरल डब्बा

जाई देख भाऊ जनरल रेल्वे डब्बामा
बसी देख भाऊ जनरल रेल्वे डब्बामा

पाय ठेवले जागा नही भेटस भाऊ
काय हाल व्हतस या रेल्वे डब्बामा

काय गर्दी रहास भाऊ त्या डब्बमा
कोणी वाकडा तिकडा पडेल रस्तामा

कोणीच कोणले पडेल नही रहास
जो तो ज्यांना त्यांना धुधंमा रहास

कोणी बिगर टिकिटना फिरस डब्बामा
कोणी फेकतस गासोडा पायसमा

ज्यांना त्यांना जीव समायना पडस
कधी बसानं नही जनरल रेल्वे डब्बामा

कवी.दिलीप हिरामण पाटील
कापडणे ता जि धुळे
मो.नं.९९७३३८९८७३

साप्ताहिक
दर्पण जगत
मंगळवार
दिनांक : १७ फेब्रुवारी २०२६

# आकर्षक मानेसाठी

स्नानाच्या वेळी केस डोक्यावर बांधा व मऊ बॉडी स्क्रबने मान स्वच्छ करा.

दररोज चेहरा स्वच्छ करताना निरशा दुधाने वा क्लीबजिंग मिल्कने मान स्वच्छ करा.

दर दोन दिवसांनी चमचाभर बेसन, थोडीशी हळद, चमचाभर कच्चे दूध व लिंबाच्या रसाचे काही थेंब एकत्र मिसळून पेस्ट तयार करून मानेला लावावी व १५ मिनिटांनी धुवावी.

जर मान जास्त काळी असेल तर ती स्वच्छ करण्यासाठी चमचाभर मुलतानी माती, चमचाभर दही व लिंबाचा रस एकत्र करून मानेवर १५ मिनिटे ठेवावा व नंतर धुऊन टाकावा.

उन्हात जाण्यापूर्वी सनस्क्रीन लोशन वा क्रीम मानेवर लावा.

एक चमचा मुलतानी माती, एक चमचा चंदन पावडर, चिमूटभर हळद व चमचाभर दूध एकत्र मिसळून पेस्ट बनवून मानेला १५ मिनिटे लावून ठेवा व नंतर धुऊन टाका.

दररोज २ ते ३ मिनिटे मानेची कमनीयता व लवचीकता वाढविण्याचा व्यायाम केल्यास काही महिन्यातच अपेक्षित परिणाम स्पष्ट दिसू लागतो.

मान प्रथम उजवीकडे वळवा नंतर डावीकडे वळवा. असे रोज १५ ते २० वेळा करा. यामुळे मानेचा लवचीकपणा वाढतो.

सरळ उभे राहून दीर्घ श्वोस घ्या व मान वर उंच उचला व हळूहळू श्वा.स सोडत मान खाली आणा.

जर आपली मान व चेहरा छोटा असेल तर व्ही आकाराच्या गळ्याचा पोशाख घाला व त्यावर लांब पातळ चेन घाला. यामुळे मान लांब दिसेल.

लंबगोल चेहरा व सडपातळ मानेवर चौकोनी गळ्याचा वा कॉलर मुडपलेल्या गळ्याचा पोशाख घालावा. यावर गोल मण्यांची माळ खुलून दिसते. चौकोनी चेहरा व मध्यम आकाराचा गळा यावर यू आकाराच्या गळ्याचा पोशाख खुलतो. यावर राणीहार वा मोत्यांची माळ शोभून दिसते.

आकर्षक मानेसाठी मसाज

आपली मान अनेक कारणाने दुखू शकते. नेहमी वाचन करणे, सारखे लिखाण करणे या गोष्टींमुळे मानेच्या स्नायूंवर ताण पडून मानेच्या मणक्योंना कडकपणा येतो. तक्याक जरी मानेखाली घेतला किंवा उंच उशी घेऊन झोपल्याने मानेच्या बाजूचे स्नायू कडक होतात. कधी कधी मणक्याळतले अंतर वाढून मागच्या बाजूला डोके दुखते. एखाद्या वेळेला चक्कर सुद्धा येते. कोणत्याही अवस्थेत झोपताना त्रास होतो. उजव्या किंवा डाव्या हाताच्या बोटापर्यंत मुंग्या येतात.

खूप सूज येत असल्यास ती कमी करण्यासाठी निलगिरी तेल किंवा टर्पेटाईन चोळून मिठाच्या गरम पाण्याने शेकावे. दिवसभरात २ ते ३ वेळा



शेकल्यास सूज कमी होते. मानेच्या तिसऱ्या मणक्यांत कठीणपणा जाणवत असल्यास दोन्ही हातांनी बोटांनी कंपन पद्धतीचा गोलाकार मसाज करावा लागतो. पाचव्या व सहाव्या मणक्यानतील अंतर कमी असेल तर कौशल्यपूर्ण बोटे ताणून तीन बोटांनी हलकासा दाब पद्धतीचा मसाज करावा. त्यामुळे कडकपणा कमी होऊन मानेच्या हालचाली परत सुलभ रितीने होऊ लागतात. मानेखाली ठेवता येईल अशा कोणत्याही लहान डब्याला कापड गुंडाळून तो मानेखाली धरल्यास मानेला आलेला ताण बराचसा कमी होऊन दुखणे कमी होते. रोज झोपताना डोक्यानखाली पांघरुणाची घडी घ्यावी अथवा मऊ कमी जाड असलेली उशी घ्यावी.

# मातृत्त्वाचा अनुभव

प्र सू ती हो णा ऱ्या महिलांच्या तु-लनेत ज्या महिलांच्या प्रसुतीसाठी मदत घ्यावी ला-गते, त्यांना संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते. पाणी फुटल्याने जीवाणूंचा धोका संभवतो. योनी मार्गातील हे सूक्ष्मजीव गर्भाशयापर्यंत पोहोचू शकतात आणि त्यामुळे संसर्ग होण्याची शक्यता असते. यामुळे गर्भाशय आणि त्या शेजारील उतींना होणाऱ्या संसर्गाला प्युरपरला सेप्सिस असे म्हणतात. सी-सेक्शन प्रसूतीदरम्यान झालेल्या जखमांची शस्त्रक्रियेनंतर योग्य काळजी घेणे आवश्यक असते.

सिझेरिअन प्रसूती झालेल्या महिलांना अधिक श्रम करावे लागल्यास किंवा पडदा फाटल्यास त्यांना एन्डोमेट्रिटिस होण्याचा सर्वाधिक धोका असतो. प्रसूतीनंतर महिलांची रोगप्रतिकारकशक्ती अतिशय कमी असते. त्यामुळे रुग्णालयातील डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांनी प्रसूती झालेल्या महिलेची काळजी घेणे आवश्यक असते.

नवीन मातांना स्तनांमध्ये संसर्ग होण्याचाही धोका असतो. त्यामुळे दूध पाजत असताना महिलांना त्रास होऊ शकतो. यासोबतच स्तनाग्रांना भेग पडण्याचाही त्रास होऊ शकतो. दूध पाजताना होणाऱ्या त्रासामुळे माता मुलांना दूध पाजणे थांबू शकतात, त्यामुळे मुलांचे पोषण अपुरे राहू शकते. म्हणून यावर लगेचच उपचार होणे गरजेचे असते. स्तनपान टाळल्यामुळे साचलेल्या दुधात संसर्ग होण्याचा धोका असतो. असे दूध प्यायल्याने बाळ आजारी पडण्याची भीती असते. प्रसूतीवेळी श्रम पडल्यास महिलेला साचलेले मूत्र बाहेर सोडण्यासाठी उत्सर्जक नलिका दिली जाते, त्यामुळे योनी मार्गात संसर्ग होतो.



अस्वच्छ उत्सर्जक नलिकेमुळे संसर्ग होण्याचा धोका असतो. प्रसूतीवेळी निर्जंतुकीकरण न केल्याने या वस्तूंचा वापर केल्यामुळेही संसर्ग होण्याची शक्यणता असते. त्यामुळे नव्या मातेवर उपचार करताना डॉक्टरांनी स्वच्छता राखणे आवश्यक आहे. गर्भाचे वेष्टन हाताने काढल्यास किंवा गर्भाच्या वेष्टनाचा तुकडा गर्भाशयात राहिल्यास आईला संसर्ग होऊ शकतो.

**हे कसे टाळता येईल?**

संसर्ग झाल्याचे न समजल्यास किंवा त्यावर उपचार न झाल्यास संसर्ग धोकादायक ठरु शकतो. यामुळे मूत्रपिंडाच्या समस्या, रक्त गोठण्याची समस्या उद्भवू शकते. संसर्ग रक्तापर्यंत पोहोचल्यास सेप्टीकदेखील होऊ शकतो. त्यामुळे डॉक्टर स्वच्छ रुग्णालयाची निवड करण्यास सांगतात. स्वच्छ वातावरणात महिलेची काळजी घेतली जाणे अतिशय आवश्यक आहे. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी रुग्णांना हाताळताना हातमोजे घालणे आणि निर्जंतुकीकरण करण्यात आलेल्या साधनांचा वापर करायला हवा. योनीची तपासणी करताना निर्जतुकीकरण केलेली साधने वापरायला हवीत आणि हाताने तपासणी करायची असल्या हातमोजे घालायला हवेत. याशिवाय, नव्या मातेने स्वत:ची स्वच्छता राखणे आणि आर्द्रतेपासून स्वत:ला दूर ठेवणे गरजेचे आहे.

उपचार करताना काय करायला हवे? संसर्गाची शक्यता किंवा लक्षणे लक्षात येताच डॉक्टरांना संपर्क साधा. डॉक्टर त्या लक्षणांवर लगेच उपचार करु शकतात आणि प्रतिजैविक (अँटीबायोटिक्स) किंवा पेन किलर्स घेण्यास सांगू शकतात. त्यामुळे स्तनपान करताना त्रास होणार नाही. आंबवलेले पदार्थासोबतच अधिकाधिक द्रव पदार्थाचे सेवन करा. स्तनांना संसर्ग झाल्यास डॉक्टर अँटीबायोटिक्स व्यतिरिक्त लेप किंवा क्रिम लावण्याचा सल्ला देऊ शकतात.

-डॉ. शीतल जोशी

# औषध

सफरचंद : यात लोह आणि क जीवनसत्व असते. मेंदू आणि चेतासंस्थेवर याचा चांगला उपयोग होतो

आवळा : यात सर्वात जास्त क जीवनसत्व असते. रोग प्रतिकारशक्ती वाढते

केळी : बद्धकोष्ठ आणि जुलाब या दोन्हीवर उपयोग होतो

कार्ले : यात क जीवनसत्व, लोह, कॉपर असते. मधुमेहावर उपयोग होतो

गाजर : यात अ जीवनसत्व असते. डोळे दात आणि हाडे यांच्या आरोग्यासाठी उपयोग होतो

दही : अन्नाचे पचन होते. डोळे आणि त्वचेसाठी गुणकारी

अंजीर : पोट साफ होते. यकृत विकारावर आणि दम्यावर गुणकारी

लसूण : रक्तादाब, सांधेवात, दमा, खोकला, सर्दीपडसं आणि गाऊट यावर गुणकारी

आले : अपचन आणि पोटातल्या गॅसेसवर गुणकारी

आल्याचा चहा : सर्दी-पडसं आणि खोकल्यावर गुणकारी

द्राक्षे आणि मनुका : यात लोह आणि कॉपर मॅगनीज आणि पोटॅशियम असते. पोट साफ होते.

मध : अशक्तचपणा घालवते. खोकल्यावर गुणकारी

इसबगोल : पोट साफ होते. रक्तदाब कमी होतो. जुलाबावरही गुणकारी

लिंबू : यात क जीवनसत्व असते. ह्रदय आणि त्वचा विकारावर गुणकारी

लेट्युस : अस्वस्थपणा आणि ह्रदयाची धडधड कमी करते

लिंबाची पाने : त्वचा विकारावर आणि रक्त वाढीवर गुणकारी

कांदा : रक्तासतले कोलेस्टेरॉल कमी करते

पपई : अपचन दूर करते. पोट साफ होते. यात क आणि अ जीवनसत्व व लोह असते.

डाळींब : रक्त स्थंभक. जुलाबावर गुणकारी

मुळा :किडनी स्टोन, कावीळ, आणि अल्पार्तव म्हणजे मासिक पाळीमध्ये अंगावर कमी जाणे यावर गुणकारी

लाल टोमॅटोः ऍनिमिया, रक्तजशुद्धी करते. यात अ, ब गटातली जीवनसत्वे आणि क जीवनसत्व असते.

सोयाबीन : मधुमेह, दमा, खोकला यावर गुणकारी. यात भरपूर प्रथिनं असतात

पालक : बद्धकोष्ठ दूर करते. यात अ. ई जीवनसत्व, लोह आणि पोटॅशियम असते

त्रिफळा : म्हणजे हिरडा बेहडा आणि आवळ्याचे मिश्रण. बध्दकोष्ठ, गॅस दूर करते. भूक आणि स्मरणशक्ती विाढवते.

तुळशीचा काढाः ताप, सर्दी, खोकला आणि वेदना यावर गुणकारी.

# मालेगावच्या चिमुरड्यांचा गणितात जागतिक डंका... ५०० विद्यार्थ्यांनी १० मिनिटांत सोडवले १०० प्रश्न.

**मालेगाव,–** शिक्षण क्षेत्रात मालेगावच्या शिरपेचात आज मानाचा तुरा रोवला गेला आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांनी गणिताचा बागुलबुवा दूर सारत, अवघ्या काही मिनिटांत शेकडो प्रश्न सोडवून एका ऐतिहासिक वर्ल्ड रेकॉर्डची नोंद केली आहे. या देदीप्यमान यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून या विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**नेमका विक्रम काय?**

मालेगाव तालुक्यातील २० जिल्हा परिषद शाळांमधील एकूण ५०० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला होता. आय-जिनिअस अबॅकस अकॅडमी (इंडिया) यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अवघ्या १० मिनिटांत १०० गणिती प्रश्न अचूक सोडवून नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. रेणुका लॉन्स येथे पार पडलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांचा वेग आणि अचूकता पाहून उपस्थित सर्वच थक्क झाले.

**राज्यभर राबवणार मालेगाव पॅटर्न**



यावेळी झालेल्या बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील गणिताची भीती तर दूर झालीच, पण त्यांचा आत्मविश्वासही द्विगुणित झाला आहे. मालेगावमध्ये यशस्वी ठरलेला हा पॅटर्न येणाऱ्या काळात संपूर्ण राज्यभर कसा राबवता येईल, यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

**राज्यभर राबवणार मालेगाव पॅटर्न**

यावेळी झालेल्या बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील गणिताची भीती तर दूर झालीच, पण

त्यांचा आत्मविश्वासही द्विगुणित झाला आहे. मालेगावमध्ये यशस्वी ठरलेला हा पॅटर्न येणाऱ्या काळात संपूर्ण राज्यभर कसा राबवता येईल, यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

**महत्त्वाची वैशिष्ट्ये:**

सहभागी शाळा: २० जिल्हा परिषद शाळा.

विद्यार्थी संख्या: ५०० चिमुरडे गणितज्ञ. वेळ: १० मिनिटांचे चॅलेंज.

मार्गदर्शन: आय-जिनिअस अबॅकस अकॅडमी (इंडिया). या ऐतिहासिक कामगिरीसाठी अकॅडमीची संपूर्ण टीम, शिक्षक आणि पालकांचे अभिनंदन करण्यात आले. या विक्रमामुळे ग्रामीण भागातील मुलांमध्ये असलेली बुद्धिमत्ता पुन्हा एकदा जगासमोर आली आहे.

# निकुंभ – दुसाने यांच्या सँझी–मँझीचे युद्धगान प्रभावी संजीव निकुंभ ठरले सर्वोत्कृष्ट अभिनयाचे मानकरी

**जळगाव–** महाराष्ट्रातील प्रसिद्ध रंग गंध कलान्यास आयोजित पूज्य पुरुषोत्तम दारवेकर स्मृती जागतिक मराठी साहित्य अभिवाचन महोत्सवात संजय निकुंभ- सुहास दुसाने या द्वयीने सँझी - मँझी चे युद्धगान प्रभावीपणे सादर केले. यावेळी वरिष्ठ पत्रकार व ज्येष्ठ रंगकर्मी संजय निकुंभ यांना सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनयाचे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

रंग गंध चाळीसगाव व वल्लभदास वाणिज्य वाचनालय जळगाव यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक अभिवाचन साहित्य महोत्सवात संजय निकुंभ वॉरियर्स ग्रुपने संजय निकुंभ लिखित दिग्दर्शित व अभिनीत सँझी - मँझी युद्धगान हे महायुद्धाच्या भीषणतेचे वास्तव मांडणारे मुक्तछंदिय ललित साभिनय सादर करून रसिकांची मने जिंकली.संजय निकुंभ यांनी प्रमुख सूत्रधारासह सँझ दोवस्की या युद्ध वार्ताहरच्या भूमिकेत विविध रंग भरले त्यांना मेकॅन्झी पायटेल ची भूमिका करणारे एस.डी. फाउंडेशनचे सुहास दुसाने यांनी समर्थ साथ दिली.

या मानाच्या महोत्सवात निकुंभ यांनी यापूर्वी सलग दोन वर्षे स्वलिखित दिग्दर्शित शिवशाहीच्या अज्ञात बेटावर व चार्ल्स मॅलेट ची सफर प्रभावीपणे सादर करून वाचिक अभिनयाचे पारितोषिक पटकावले होते.

यामुळे यावर्षीही सलग तिसऱ्या वर्षी सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळवून निकुंभ वॉरियर्सने सांस्कृतिक हॅट्रिक साधली आहे. अर्धांगवायुवर मात करून पुनश्य साधलेल्या सांस्कृतिक भरभराटी बद्दल संजय निकुंभ यांचे सर्वत्र अभिनंदन होते. त्यांना विश्वस्त अनिल शहा ,ज्येष्ठ रंगसाधक चिंतामण पाटील, प्राध्यापक संदीप केदार, ज्येष्ठ ग्रंथपाल अनिल अत्रे, यांचे सह विविध मान्यवरांकडुन निकुंभ व दुसाने यांना गौरविण्यात आले.

# केळी पीक विम्याचा २१७ कोटींचा घोटाळा उपग्रहाद्वारे आला समोर

**जळगाव, –** आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शासकीय योजनांमध्ये पारदर्शकता येते हे बाब जळगाव येथे कृषी विभागाने केलेल्या कारवाईत पुन्हा सिद्ध झाली आहे. केळी पिकाच्या नावाखाली तब्बल २१७ कोटी रुपयांचा सरकारी निधी लाटण्याचा मोठा कट जळगावमध्ये उपग्रहाद्वारे ( ) केलेल्या तपासणीत उघड झाला आहे. लागवड नसतानाही कागदोपत्री केळीची बाग दाखवून पीक विम्याचे संरक्षण मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या हजारो बनावट अर्जांचा कृषी विभागाने पर्दाफाश केला आहे.

पुनर्चित हवामान आधारित फळपीक विमा योजनेच्या 'आंबिया बहर' हंगामात यंदा जळगाव जिल्ह्यातून अर्जांची संख्या अनपेक्षितपणे वाढल्याचे दिसून आले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा २७ हजार २५९ अतिरिक्त अर्ज दाखल झाले होते, तर विमा संरक्षित क्षेत्रात २८ हजार १९६ हेक्टरची मोठी वाढ झाली होती.

– केळी लागवडीखालील क्षेत्रात झालेली ही वाढ संशयास्पद वाटल्याने कृषी आयुक्तालयाने उपग्रहाच्या साहाय्याने जमिनीची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.




या अत्याधुनिक तपासणीत धक्कादायक वास्तव समोर आले. जिल्ह्यातील एकूण ९६ हजार १५२ हेक्टर विमा संरक्षित क्षेत्रापैकी प्रत्यक्षात केवळ ५२ हजार ११० हेक्टरवरच केळीची लागवड आढळली.

उर्वरित ४४ हजार ४१ हेक्टर क्षेत्रावर केळीचे पीकच अस्तित्वातया प्रकरणात विमा हप्त्याच्या स्वरूपात जमा झालेले सुमारे ३७ कोटी ४३ लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. वेळेत पडताळणी झाल्यामुळे राज्य सरकारचे १२३ कोटी ५३ लाख आणि केंद्र सरकारचे ९३ कोटी ५८ लाख, असे एकूण सुमारे २१७ कोटी रुपयांचे संभाव्य नुकसान टळल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

संबंधित बोगस अर्जदारांवर कठोर कारवाईचे संकेत कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास रस्तोगी यांनी दिले आहेत.




Printed, published and owned by Pawan Ashok Khambayat and printed at Gauri Enterprises, 83, A wing, New B.J. Market Jalgaon Dist Jalgaon (MS) 425001 and published at Plot No.4/C Swanand nagar Juna Khedi Road Jalgaon Dist Jalgaon, - 425001 Editor- Pawan Ashok Khambayat . Mob. 7276285678